आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१५ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जातनिहाय जनगणनेबाबत भूमिका स्पष्ट करण्याचं काँग्रेसचं भाजपाला आव्हान, सत्तेत आल्यावर काँग्रेस आरक्षण हटवणार असल्याचा प्रधानमंत्र्यांचा आरोप फेटाळला

- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा जाहीरनामा राज ठाकरे यांच्याकडून प्रसिद्ध

- मतदानाच्या दिवशी मुंबईत विशेष लोकल सेवा, दिव्यांग मतदारांना मोफत बसची सुविधा

- आदिवासी समाजाचा वारसा आणि संस्कृती जपण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज रात्री

**<><><><><>**

जातनिहाय जनगणनेबाबत भाजपा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोंदी यांनी त्यांची भूमिका जाहीर करावी, असं आव्हान काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बालत होते. काँग्रेस अनुसूचित जाती- जमातींचं आरक्षण  संपवणार असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. काँग्रेसनंच आरक्षण देऊन मागास जातींना हक्क आणि अधिकार दिले, याउलट आरक्षण आणि संविधान संपवण्याचे प्रयत्न भाजपा करत

आहे. जातनिहाय जनगणनेला भाजपाचा विरोध आहे, त्यामुळेच प्रधानमंत्री आरक्षण संपवण्याचा खोटा आरोप काँग्रेसवर करत आहेत, असं ते म्हणाले.

मोदींची हवा संपली असून, त्यांच्या सभांना जनतेचा प्रतिसादच नाही, याउलट राहुल गांधी यांच्या सभांना मात्र प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. राहुल गांधी उद्या चिमूर आणि धामणगाव रेल्वे इथं प्रचार सभा घेणार आहेत. तर, प्रियंका गांधी उद्या शिर्डी आणि कोल्हापुरात, तसंच परवा गडचिरोली आणि नागपूरमध्ये प्रचारसभा घेतील, असे चेन्नीथला यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज गडचिरोली जिल्ह्यात आष्टी इथं प्रचारसभा घेतली. भाजपा राज्यघटना बदलणार असल्याचा खोटा प्रचार काँग्रेस करीत आहे, पण खरं तर काँग्रेसनंच अनेकदा घटनेची मोडतोड केली, असं ते यावेळी म्हणाले. लोकांना पटवून देता येत नाही म्हणून संभ्रमित करण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे, अशी टीका त्यां केली.

आम्ही घटना बदलणार नाही आणि कोणाला ती बदलूही देणार नाही, असं गडकरी म्हणाले.

**<><><><><>**

अहिल्यानगर आणि नाशिक या दोन जिल्ह्यातल्या नागरिकांच्या सिंचनाची आणि पिण्याच्या पाण्याची सोय निळवंडे प्रकल्पातून झाली आहे. आगामी काळात अकोले तालुक्याचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विकास होईल. आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांचे स्मारक लवकरच उभारण्यात येईल असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. अहिल्यानगरमध्ये प्रचार सभेत ते बोलत होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा आज मुंबईत प्रसिद्ध केला. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत मराठी भाषा अनिवार्य असायला हवी, अशी भूमिका त्यांनी या जाहीरनाम्यात मांडली आहे. गडकिल्ल्यांचे संवर्धन करणे गरजेचे असून शिवरायांच्या मंदिरापेक्षा विद्या मंदिर बांधणे महत्वाचे आहे, असं राज ठाकरे यांनी यावेळी स्पष्ट केलं. गेल्या १९ वर्षात आम्ही काय केलं यावरची पुस्तिकाही त्यांनी आज प्रसिद्ध केली.

येत्या रविवारी मुंबईतल्या शिवाजी पार्क मैदानावर मनसेच्या सभेसाठी अद्याप परवानगी मिळालेली नाही. वेळ अपुरा असल्याने ही सभा न घेता मतदार संघांना भेटी देण्यात येतील, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

निवडणूक आयोगाच्या पथकाने काल रात्री छत्रपती संभाजीनगरमधल्या सिल्लोड इथं नाकाबंदीदरम्यान एका कारमधून १९ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले. अमरावतीमध्येही नागपुरी गेट चौकातून दरियापूरकडे जाणाऱ्या वाहनातून पोलिसांनी पाच कोटींहून अधिक किमतीचे सोने आणि १७ लाख रुपयांचे चांदीचे दागिने जप्त केले आहेत. अमरावती शहरातच दोन वाहनांमधून अडीच कोटी रुपयांची रोकडसुद्धा पोलिसांनी जप्त केली आहे.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेतर्फे मतदारांच्या सोयीसाठी विशेष उपनगरी गाड्या चालवल्या जाणार आहेत. या विशेष गाड्या १९ ते २१ या कालावधीसाठी मध्य रेल्वे मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण आणि हार्बर रेल्वे मार्गावरून सीएसएमटी ते पनवेल असा प्रवास करतील.

मतदानाच्या दिवशी मुंबईत दिव्यांग मतदारांसाठी विशेष मोफत बस सेवाही दिली जाणार आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात गृहमतदानाला आज सुरुवात झाली. कुडाळ तालुक्यात झाराप इथं घरोघरी जाऊन दिव्यांग तसंच ८० वर्षांवरच्या ज्येष्ठ नागरिकांच मतदान घेण्यात आलं.

**<><><><><>**

भंडाऱ्यात आज मतदार जनजागृतीसाठी रॅली झाली. नव-मतदारांनी स्वतः मतदान करत  कुटुंबातल्या इतर सदस्यांनाही  मतदानासाठी प्रवृत्त करावं, मतदानाच्या दिवशी अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन जिल्हाधिकारी संजय कोलते यांनी केलं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज सातारा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

आपलं सरकार आदिवासी समाजाचा वारसा आणि संस्कृती जपण्यासाठी वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. जमुई इथल्या जाहीरसभेला ते संबोधित करत होते. धरती आबा जनजाती ग्रामउत्कर्ष

अभियानांतर्गत आदिवासी गावांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ८० हजार कोटी रुपये खर्च केले जातील, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आदिवासी समाजासाठी असा उपक्रम राबविल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले.

आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये बिरसा मुंडा गौरव उपवन सुरू करण्याची घोषणा केली. तसंच, त्यांनी यावेळी जनजाती गौरव दिवसाच्या निमित्ताने दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून ६ हजार ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. पीएम-जनमन योजनेअंतर्गत बांधलेल्या ११ हजार घरांचा गृहप्रवेशही त्यांनी केला. तसंच, त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंती वर्षाचा प्रारंभ करताना बिरसा मुंडा यांच्या जीवनावर आणि समृद्ध आदिवासी वारसा तसंच संस्कृतीवर आधारित प्रदर्शनाचं उद्घाटनही केलं. यासोबत त्यांनी दोन आदिवासी स्वातंत्र्य सैनिक संग्रहालयं तसंच दोन आदिवासी संशोधन संस्थांचंही उद्घाटन केलं.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी- पुसद रस्त्यावर झरा फाटा इथं अपघातात १३ जण जखमी झाले. भाविकांची क्रुझर जीप रस्त्यावर उभ्या असलेल्या उसाच्या ट्रॉलीला धडकल्यानं हा अपघात झाला. अपघातातल्या सात जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यातल्या तिघांना नांदेड आणि चार रुग्णांना हिंगोली इथं उपचारासाठी दाखल केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत बीकेसीतल्या मेट्रो स्थानकाच्या एका प्रवेशद्वाराबाहेर आज दुपारी आग लागली. ही आग विझवण्याचे प्रयत्न अग्निशमन दलाकडून सुरू आहेत. सर्व

प्रवाशांना सुरक्षितरित्या स्टेशनबाहेर काढलं आहे. तसंच या स्थानकावरची मेट्रो सेवा तात्पुरती बंद केल्याचं मेट्रो प्रशासनानं कळवलं आहे.

<><><><>

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांची ५५५ वी जयंती आज भारतासह जगभरात भक्तिभावानं आणि उत्साहात साजरी होत आहे. पंजाबमधे अमृतसर इथं हरिमंदिर साहिब आणि इतर गुरूद्वारांमधे हजारों भाविकांनी दर्शन घेतलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्र्पती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुरु नानक जयंतीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांनी आपल्याला कठोर परिश्रमावर आधारित अध्यात्माचा मार्ग दाखवला, तसंच सत्य, समाधान, दया आणि प्रेमावर आधारित समाज कसा निर्माण करायचा हे शिकवलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. गुरुनानक यांनी सांगितलेल्या सत्य, शांतता आणि एकतेच्या तत्त्वांसाठी लोकांनी स्वतःला समर्पित करावं, असं उपराष्ट्र्पती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. तर गुरु नानक यांची शिकवणूक आपल्याला करुणा, दया आणि नम्रतेची मार्गावर चालण्यासाठी प्रेरणा देते, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

<><><><>

गुरु नानक जयंतीनिमित्त नांदेडच्या सचखंड गुरुद्वारासह विविध गुरुद्वाऱ्यांमध्ये भजन, कीर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत.

आज कार्तिकी पौर्णिमा देखील आहे; त्यामुळे राज्यात ठिकठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन केलं आहे.

<><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा आणि शेवटचा सामना आज रात्री होणार आहे. जोहान्सबर्गच्या वांडरर्स स्टेडियमवर रात्री साडे आठ वाजता सुरू होईल. चार सामन्यांच्या या मालिकेत भारत २-१ ने आघाडीवर आहे.

**<><><><><>**

एटीपी टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीत आज भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू एबडेन या जोडीचा सामना केव्हिन क्रॅविट्झ आणि जर्मनीच्या टीम पुएत्झ यांच्याशी  होईल. हा सामना भारतीय वेळेनुसार आज संध्याकाळी ४ वाजता सुरु होणार आहे.

**<><><><><>**

वायू प्रदुषणाच्या वाढत्या पातळीमुळे नवी दिल्लीतल्या सर्व प्राथमिक शाळा आजपासून पुढचे आदेश येईपर्यंत ऑनलाईन तत्वावर चालवल्या जातील असे निर्देश दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून दिले आहेत. हवेचं दर्जामापन करणाऱ्या समितीने दिलेल्या इशाऱ्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**//<><><><><>//**